# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### दिनांक २ मे, २०१२ च्या भरती बंदीनंतर मंजुरी व शालार्थ आयडी मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देणेबाबत

**(१) ३४६४ (२८-०५-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ मे, २०१२ च्या भरती बंदीनंतर मंजुरी व शालार्थ आयडी मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्यासाठी निधी मंजूर झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादूर्भावामुळे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात झालेली महसूली घट विचारात घेऊन वित्तीय उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाकडून फक्त नियमित

वेतनाकरीताच तरतूद प्राप्त होत आहे. नियमित वेतनासोबत थकीत वेतनासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत वित्त विभागास पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर बिच शॅक्स उभारण्याबाबत

**(२) ४७८८ (१०-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक २७४ ला दिनांक ६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ८ समुद्र किनाऱ्यांवर बिच शॅक्स उभारण्यास राज्यमंत्री मंडळाच्या बैठकीत मान्यता दिल्याचे माहे जून, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बिच शॅक महाराष्ट्र पर्यटन महामंडळाच्या व इतर माध्यमातून राबविण्यात येणार असून बीच शॅक्स धोरण घोषित करण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच बीच शॅक्स धोरणाची अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे व सदरहू धोरणासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत सविस्तर आराखडा तयार केला आहे काय, तसेच सदरहू बीच-शॅक्स धोरण केव्हापासून कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०६-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दिनांक १७/०८/२०२० अन्वये राज्याचे बीच शॅक धोरण जाहीर करण्यात आले आहे. सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा अंतिम झाल्यानंतर प्रत्यक्ष बीच शॅक्स उभारणे शक्य होईल. यासाठी निधीची आवश्यकता नाही.
पर्यटकांसाठी पायाभूत सुविधा आणि स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी शाळांमधील कंत्राटी शिक्षकांना नोकरी व वेतन देण्याबाबत

**(३) ५१४७ (१८-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळांमधील कंत्राटी शिक्षकांना कोविड-१९ च्या संकटकाळात नोकरीवरून काढल्याचे तसेच त्यांचे वेतन दिले जात नसल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद ठाणे यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनानुसार खाजगी शाळांमधील कंत्राटी शिक्षकांना नोकरी व वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासन पत्र दिनांक २७/०५/२०२० अन्वये याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.ठाणे यांनी दिनांक २३/१०/२०२० च्या पत्रान्वये चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नैसर्गिक वाढीव तुकड्यांना शासनाची मान्यता मिळण्याबाबत

**(४) ६७५२ (१५-०३-२०२१) श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक वाढीव तुकड्यांना शासनाची मान्यता मिळण्याबाबत संबंधितांकडून संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढीव तुकड्यांना मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशत खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक २८/०८/२०१५ नुसार शाळांना नैसर्गिक वाढ अनुदानित/ विनाअनुदानित तत्वावर अनुज्ञेय नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. सबब शासन धोरणानुसार संबंधित शाळा/ संस्थाची वाढीव तुकड्यांना मान्यता देण्याची मागणी मान्य करणे शक्य नाही, असे क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आले आहे.

---

## धान उत्पादक शेतकऱ्यांना रोवणीच्यावेळी आर्थिक मदत देण्याबाबत

**(५) ८४०९ (०९-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानाला बोनस देण्याऐवजी धान उत्पादक शेतकऱ्यांना रोवणीच्या वेळी आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यामुळे धान उत्पादक शेतकरी संभ्रमात असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही मदत नेमकी कोणत्या स्वरुपाची, किती रक्कमेची असेल यासंदर्भात शेतकऱ्यांशी शासनाने कोणतीही चर्चा केलेली नसल्यामुळे सदर प्रस्तावासंदर्भात शेतकऱ्यांच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोवणीचा खर्च एकरी रूपये २७००/- ते ३०००/- इतका अधिक असतो, त्यानुषंगाने शासन बोनसच्या धर्तीवर जर रोवणीला मदत देणार असेल तर रोवणीचा खर्च कसा भरुन निघणार, अशा प्रकारचे प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून दिला जाणारा बोनस ५० क्विंटलपर्यंतच्या उत्पादनापूरताच मर्यादित असल्याने त्यापेक्षा कमी किंवा अधिक उत्पादन झाले तर बोनस मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून धानासाठी निश्चित केलेल्या हमीभाव व्यतिरिक्त कोणतीही प्रोत्साहन राशी (बोनस) दिली जात नाही. तथापि, मागील काही हंगामात धान उत्पादनाचा वाढता खर्च विचारात घेऊन राज्य शासनातर्फे केंद्र शासनाने घोषित केलेल्या हमीभावाव्यतिरिक्त राज्यातील शेतकऱ्यांना किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाला प्रोत्साहन राशी दिलेली आहे. सदर प्रोत्साहन राशी प्रतिक्विंटल, प्रति शेतकरी ५० क्विंटलच्या मर्यादेत दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयामधील उल्हास नदीतील जलपर्णी हटविण्याबाबत

**(६) ८९५७ (१५-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ६७२३ ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील उल्हास नदीत जलपर्णी पसरल्याने मच्छीमारांचा मासेमारी व्यवसाय बंद होत असल्याने मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आह काय,

(२) असल्यास, सदरहू जलपर्णीत मासे अडकून पडत असून लहान जलचर प्राणी मरुन पडतात, तसेच नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्यामुळे नदी स्वच्छतेसाठी उपाययोजना करण्याची मागणी उल्हास नदी बचाव कृती समितीने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उल्हास नदीतील जलपर्णी हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१७-१२-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेकडून दिनांक ०२/०३/२०२१ ते दिनांक ०१/०६/२०२१ पर्यंत मनुष्यबळाच्या सहाय्याने मोहने उदंचन केंद्र व मोहिली उदंचन केंद्र येथील जलपर्णी काढण्यात आली आहे.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेकडून महानगरपालिका हद्दीलगत अंदाजे ५०० मी. लांबीच्या नदीपात्रात असलेली जलपर्णी काढण्याचे काम ८ फेब्रुवारी, २०२१ ते मार्च, २०२१ दरम्यान पूर्ण केले आहे. तसेच वारंवार निर्माण होणारी जलपर्णी तातडीने काढण्यासाठी विड हार्वेस्टींग मशीनव्दारे काढण्याकरीता निविदा मागविण्यात आली असून निविदा प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय विमा हप्ता प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत

**(७) १०१८३ (२०-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१४ मध्ये शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सुरु केलेल्या वैद्यकीय विमा हप्ता योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सदरहू योजना सुरु करण्याची मागणी मंडळाच्या कर्मचारी संघटनेने शासनाकडे माहे जून, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय विमा हप्ता प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-१२-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती, कुटुंबनिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत

**(८) १०१८४ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व कुटुंबनिवृत्ती योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सन १९८८ पासून आजतागायत शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायद्यातील तरतुदीनुसार इतर राज्यातील प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सेवानिवृत्ती आणि कुटुंबनिवृत्ती योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व कुटुंबनिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, सदरहू प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-१२-२०२१) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ८/०५/२०१८ च्या पत्रान्वये सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावावर शासन स्तरावर विचारविनिमय करुन शासन पत्र दिनांक १६/०५/२०१९ अन्वये मंडळास कळविण्यात आले आहे की, "यापुढे कोणत्याही अनुदानित संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादी मधील कर्मचाऱ्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंबंधीचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊ नयेत, असे निर्देश शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०८/११/२००५ अनव्ये देण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार आता सेवानिवृत्ती वेतन योजनेचा निर्णय घेणे योग्य नाही."

तसेच यापूर्वीसुध्दा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला याविषयी दिनांक ३१/०५/२०१२ च्या पत्रान्वये उपरोक्तप्रमाणे कळविण्यात आले आहे.

---

## राज्यातील शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) १०२०३ (०८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागात विविधस्तरावर आयुक्त ते उपशिक्षणाधिकारी व तत्सम अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून प्रभारी कार्यभारावर कामकाज सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागात एकूण किती मंजूर व रिक्त पदे आहेत, त्यापैकी किती पदे प्रभारी कार्यभारावर आहेत, तसेच, कोणत्या स्तरावर किती पदे रिक्त आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू रिक्त पदे केव्हापर्यंत भरण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२२-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शालेय शिक्षण विभागात एकूण मंजूर पदे १३१७ आहे व रिक्त पदे ७६८ आहे तसेच प्रभारी रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दिनांक ०५/०९/२०१८ नुसार दिला जातो. कामकाजात अडचण निर्माण होऊ नये या करीता रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून काम पार पाडले जाते. यातील काही अतिरिक्त कार्यभार शासनस्तरावर व काही अतिरिक्त कार्यभार मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावरुन दिले जातात. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात सहाय्यक प्राध्यापक पदभरती बिंदू नामावलीनुसार करण्याबाबत

**(१०) १०२३९ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सहाय्यक प्राध्यापक पदभरतीसाठी सन १९९० पासून विषयनिहाय आरक्षण लागू करण्यात आल्याने शंभर पॉईंट बिंदू नामावलीनुसार विषयनिहाय आरक्षणाचीच पदे भरली जात असताना केंद्र शासनाने लागू केलेले २०० पॉईंट रोस्टर विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये लागू केल्यास मागील ६ वर्षांपासून हजारो प्राध्यापकांच्या रिक्त जागांवर संधी न मिळण्याची भीती मागासवर्गीय उमेदवारांमध्ये असल्याची माहे एप्रिल, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कायदा केंद्रीय शिक्षण संस्था आणि केंद्रीय विद्यापीठामधील पदभरतीसाठी असतानाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यात लागू करण्यासाठी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २०० पॉईंट रोस्टरमध्ये विषयाऐवजी संपूर्ण महाविद्यालय किंवा संपूर्ण विद्यापीठ हाच एकक मानला जात असल्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांचा आजपर्यंतचा अनुशेषही रद्द होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागील अनुशेष रद्द न करता १०० पॉईंट बिंदू नामावलीनुसार भरती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) सद्य:स्थितीत राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांबाबत शासन निर्णय दिनांक २४/०४/१९९५ मधील तरतुदीनुसार विषयनिहाय व संवर्गनिहाय आरक्षण धोरणानुसार व सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २९/०३/१९९७ अन्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीनुसार पदभरती प्रक्रिया राबविण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील शाळांचे प्लॅन मधून नॉन प्लॅनमध्ये वर्ग करून वेतन अदा करण्याबाबत

**(११) १०२४२ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयामधील शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन प्लॅन या लेखाशिर्षातून होत असल्याने वेतन नियमित अदा केले जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विषयी लेखाशिर्षात बदल करून प्लॅन मधील शाळांचे वेतन नॉन प्लॅनमध्ये करण्याची विनंती संघटनेतर्फे तसेच नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास अनेकवेळा निवेदने देवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागीय उपसंचालकांनी दिनांक १२/११/२०१९ रोजी वेतन पथक कार्यालय (माध्य.) गडचिरोली यांच्याकडून मागितलेली माहिती वेतन पथक कार्यालयाने दिनांक ०१/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) होय.
(४) विभागाची विनंती अमान्य करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(१२) १०३७२ (१७-११-२०२१) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याच्या प्रस्तावाबाबत अल्पसंख्यांक विकास विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अभिप्राय घेण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, सर्व विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेनंतर मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतनात वाढ करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०९-१२-२०२१) :** (१), (२) व (३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबतची बाब धोरणात्मक असून याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाविद्यालयातील तसेच शाळेतील मुख्याध्यापक/कर्मचाऱ्यांना अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन संरचनेनुसार देय ठरविण्याबाबत

**(१३) १०४८४ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व अशासकीय अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक/कर्मचाऱ्यांना अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन संरचनेनुसार करण्याप्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक २४ मे, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाच्या आधारावर उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे शासन निर्णय निर्गमित न केल्याने अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजेचे रोखीकरण सुधारित वेतन संरचनेनुसार देय ठरले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त विभागाच्या दिनांक २४ मे, २०१९ च्या शासन निर्णयाच्या आधारावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०४/१०/२०२१ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजेचे रोखीकरण सुधारित वेतनसंरचनेनुसार देय ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहू शासन निर्णय केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, निलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिसूचना दिनांक ७/९/२०१९ मधील टिप १-(एक) नुसार दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी रजा वेतन प्रदेय रजेवर असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यास सुधारित वेतन संरचना दिनांक १ जानेवारी, २०१६ अथवा विकल्पानुसार सुधारित वेतन संरचना स्विकृतीच्या दिनांकापासून लागू करण्याबाबतची तरतूद आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पदवीधर शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(१४) १०४८६ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अस्तित्वात आल्यानंतर उच्च प्राथमिक (वर्ग ६ वी ते ८ वी) वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेमधील बदलाशी सुसंगत बदल वेतनश्रेणीमध्ये करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता ६ वी ते ८ वीच्या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी १/३ शिक्षकांना सेवाज्येष्ठतेप्रमाणे पदवीधर वेतनश्रेणी देय ठरवून २/३ शिक्षकांना पदवीधर वेतन श्रेणीपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महत्त्वाच्या विषयाबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक २७/०९/२०२१ रोजी पत्र पाठवून इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गावरील पदवीधर शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी देय घोषित करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहू शासन निर्णय केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) उच्च प्राथमिक स्तरावरील पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले असून, तद्नंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रास्त भाव धान्य दुकानदार ग्राहकांची फसवणूक करित असल्याबाबत

**(१५) १०४९९ (१७-११-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाभार्थ्यांनी स्वस्त धान्य दुकानावर धान्य घेतल्यानंतर त्याची पावती देणे बंधनकारक असतानाही मुंबईतील बहुतांश रास्त भाव धान्य दुकानदार पावती देण्यास विलंब करित असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रास्त भाव धान्य दुकानदार ग्राहकांना पावती देत नसल्याने शासनाकडून लाभार्थ्यांना मंजूर झालेले धान्य आणि प्रत्यक्षात वितरित झालेले धान्य यातील फरक लक्षात येत नसल्याने दुकानदार धान्य विक्रीमध्ये काळाबाजार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१३-१२-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश (व्दितीय) १९६६ (विनिमय) मधील कलम १८ एफ नुसार प्रत्येक शिधापत्रिकाधारकास त्याने घेतलेल्या अन्नधान्याची रितसर पावती मिळणे ही संविधानिक तरतूद आहे. शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस मशीनवर लाभार्थ्यांची बायोमेट्रिक पध्दतीने ओळख पटवूनच शिधाजिन्नसांचे वितरण करून पावती देण्यात येते. सर्व दुकानांना नियमितपणाने पावतीसाठी पेपर रोल उपलब्ध करून दिले जातात. जर एखाद्या ई-पॉस मशीनमधून पावती निघत नसेल तर तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मदतीने तात्काळ मशीन दुरूस्त करून दिले जाते. शिधापत्रिकेतील काही सदस्यांचे आधारसिडींग झाले नसेल तर अशा सदस्यांच्या आधारकार्डच्या प्रती संकलित करून आधारसिडींग करण्यात येते. शिधापत्रिकाधारकास विहित परिमाणानुसार देय असलेले शिधाजिन्नस ई-पॉस मशीनवर दर्शविलेले असते. लाभार्थ्यांना वितरीत होणारे शिधाजिन्नस www.mahaepos.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून लाभार्थ्यांना देय असणारे शिधाजिन्नस पाहता येत असल्याने शिधाजिन्नस वितरणात पारदर्शकता आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोफळी (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत

**(१६) १०५४९ (१७-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोफळी (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री यांना दिनांक ०७ जुलै, २०२१ रोजी दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री महोदयांनी सदर पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ सादर करणेबाबत अभियान संचालक, जल जीवन मिशन अभियान यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार पोफळी (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पोफळी, ता.मोताळा, जि.बुलढाणा व ३ गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) तयार करण्यात आला असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जुलै रोजीची वार्षिक वेतनवाढ देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत

**(१७) १०६२६ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिनांक १ जुलै ते दिनांक ३० जून या एक वर्षाच्या कालावधीत दिलेली सेवा विचारात घेवून शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै रोजी वार्षिक वेतनवाढ देय ठरते परंतु दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक/कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै रोजीची देय असलेली वार्षिक वेतनवाढ देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले अपील मान्य करण्यात आले असून मा.सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाचे शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक १८/०६/२०२१, दिनांक ३१/०८/२०२१ व दिनांक ०८/१०/२०२१ रोजी पत्र पाठवून शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शासन निर्णय निर्गमित करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, शासनाद्वारे केव्हापर्यंत सदरहू शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१)** : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत अद्याप कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्य शासनाच्या स्तरावर अद्याप धोरण निश्चित करता आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सीबीएसई संलग्नित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा संरक्षित करणारा कायदा करुन शाळा न्यायाधिकरण गठीत करणेबाबत

**(१८) १०६३१ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीबीएसई संलग्नित शाळेतील सुमारे १ लाखपेक्षा जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा संरक्षित करणारा कायदा व शाळा न्यायाधिकरण गठीत करणे या मागण्यांसाठी सीबीएसई स्कूल स्टाफ वेलफेअर असोसिएशन या संघटनेने "जन आंदोलनाची" सूचना शासनास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायदा व नियमांचे संरक्षण नसलेले सुमारे एक लाखपेक्षा जास्त शिक्षक/कर्मचारी विद्यार्थ्यांना शिक्षण देत असून शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या सेवांचे निर्धारण करणारा कायदा व नियम अस्तित्वात आणण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीबीएसई बोर्डाचे कार्यक्षेत्र इयत्ता ९ वी ते १२ वी चा अभ्यासक्रम निर्धारित करणे व परीक्षा घेणे इतक्या पुरताच मर्यादित असून सीबीएसई संलग्नित शाळेतील इयत्ता १ ली ते ८ ली पर्यंतचे अभ्यासक्रम निर्धारित करणारी यंत्रणा अस्तित्वात नसल्यामुळे खाजगी प्रकाशकाद्वारे प्रकाशित अभ्यासक्रम सदर शाळांमध्ये शिकविला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सीबीएसई संलग्नित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा सरंक्षित करणारा कायदा करुन शाळा न्यायाधिकरण गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२२) :** (१) होय.

(२) सीबीएसई अंतर्गत शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या सेवांचे निर्धारण करणारी नियमावली सीबीएसईने विहीत केली आहे.

(३) हे खरे नाही.

इयत्ता १ ली ते ८ वी चा अभ्यासक्रम एनसीईआरटी तयार करतील व पाठ्यपुस्तक निर्मिती एनसीईआरटी व खाजगी प्रकाशनामार्फत केली जाते.
(४) यासंदर्भातील सीबीएसईची स्वतंत्र नियमावली अस्तित्वात असल्याने शाळा न्यायाधीकरण गठीत करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक/कर्मचारी सेवेत पूर्ववत रूजू होईपर्यंतचा कालावधी सेवाकाळ ग्राह्य धरण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत

**(१९) १०६३२ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रकरणात व्यवस्थापन मंडळाकडून तसेच शासनाकडून न्याय मिळत नसल्याने शिक्षक कर्मचाऱ्यांची अनेक प्रकरणे न्यायालयात दाखल होतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक प्रकरणांमध्ये शिक्षक कर्मचाऱ्यांना नियमबाह्यपणे सेवेतून निलंबित किंवा बडतर्फ करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये शिक्षक/कर्मचारी सेवेत पूर्ववत रूजू होईपर्यंतचा कार्यकाळ हा सेवाकाळ (कर्तव्यकाळ) समजण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३०/०४/२०२१ व दिनांक २६/०९/२०२१ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) शासनास असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही तथापि, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यास दोषमुक्त केले असल्यास त्याचा निलंबन कालावधी नियमित सेवाकाळ म्हणून गणला जातो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्राध्यापकांना परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातलेल्या कालावधीतील वेतन अदा करण्याबाबत

**(२०) १०६४० (१७-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्त विभागाच्या सल्ल्याची किंवा मान्यतेची आवश्यकता नाही या विषयाबाबत प्रा. बी.टी. देशमुख यांनी तपशीलवार माहिती देणारे २५ परिच्छेदाचे एक टिपण मा.सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत दिनांक ९ मार्च, २०२० रोजी शासनास पाठविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील प्राध्यापकांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातलेल्या कालावधीत वेतन अदा करणे या विषयावर विधान परिषद सभागृहामध्ये गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२० रोजी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने तपशीलवार चर्चा झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने निर्णय घेवून त्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत काय, तसेच, मा.वित्त मंत्र्यांना चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन दिनांक ०७/१२/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.